जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८६६ दिनांक - १३/१२/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

**घरफोडीचा गुन्हा उघडीस आणलेबाबत**

दि.१९/११/२०२३ रोजी ते दि.०८/१२/२०२३ रोजी फिर्यादी यांचे मांगडेवाडी कात्रज पुणे येथील राहते घर कुलुप लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराचे खिडकीचे ग्रिल कशाचे तरी सहाय्याने तोडुन त्यावाटे आत घरात प्रवेश करून ताब्या पितळेची भांडी व इतर साहित्य चोरी केले म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७९२/२०२३, भादंवि कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली शोध घेत असताना पोलीस अंमलदार अवधुत जमदाडे, अभिनय चौधरी, सचिन गाडे यांना सदरचा गुन्हा हा इसम **अरबाज खलील शेख, वय १९ वर्षे,रा.भारत नगर, कात्रज, पुणे** याने केला आहे अशी बातमी मिळाली. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार सदर आरोपीताचा शोध घेवुन त्यास अटक करुन त्यांचेकडुन गुन्हयातील चोरी केले ताब्या पितळेची भांडी जप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड, तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहा. पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, अवधतु जमदाडे, सचिन गाडे, अभिनय चौधरी, आशिष गायकवाड, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारावकर, मंगेश पवार, निलेश ढमढेरे, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.